# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** अमृत २.० योजनेअंतर्गत "पोहरा नदी प्रदूषण निर्मुलन प्रकल्प"
**{सार्व.आरो.अभि. विभाग}** मलनि:स्सारण योजनेची कामे. Package-४ Construction of Sewage collection System of SZ-४, GM ४-२, GM ४-४ and allied works.

नागपूर महानगरपालिके करीता केंद्र पुरस्कृत शासनाचे अमृत-२.० योजने अंतर्गत "पोहरा नदी प्रदूषण निर्मुलन प्रकल्प" अंतर्गत नागपूर शहरातील साऊथ सिवरेज झोन व हुडकेश्वर आणि नरसाळा करीता सांडपाणी संकलन प्रणालीचा विकास करणे व प्रक्रिया बाबतचा रु. १०३०/- कोटींचा विस्तृत प्रकल्पाचा समावेश करण्यात आलेला आहे. केंद्र पुरस्कृत अमृत-२.० अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत शासन निर्णय क्र. अमृत-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-३३, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १४ जुलै २०२२ अन्वये निर्णयात नमुद केल्यानुसार केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान २५%, राज्यशासन अनुज्ञेय अनुदान २५% महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे आणि नागपूर महानगरपालिकेचा हिस्सा ५०% आहे.

नागपूर महानगरपालिकेद्वारे पोहरा नदी प्रदूषण निर्मुलन प्रकल्प चा विस्तृत प्रकल्प अहवाल रु. ९५७.०१ कोटी (GST सह) तयार करण्यात येवून मुख्य अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी तांत्रिक मंजूरी दिनांक २८.०७.२०२३ ला प्रदान केलेली आहे. तसेच शासन निर्णय क्र. अमृत-२०२३/प्र.क्र.४६०/नवि-३३, मंत्रालय मुंबई — ४०००३२, दिनांक ९ नोव्हेंबर २०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. प्राप्त मंजूरीन्वये पोहरा नदी प्रदूषण निर्मुलन प्रकल्पाकरीता एकूण ५ पॅकेजमध्ये निविदा दिनांक ११.०१.२०२४ ला प्रसिध्द करण्यात येवून त्याची अंतिम मुदत दिनांक २७.०२.२०२४ ही होती.

विषयांकीत पॅकेज क्र. ४ करीता ई-निविदा दिनांक ११.०१.२०२४ ला बोलविण्यात आल्या असता दिलेल्या मुदतीत दिनांक २७.०२.२०२४ पर्यंत एकूण ४ निविदा प्राप्त झाल्यात. प्राप्त चारही निविदाकारांचे तांत्रिक निविदा तपासणी अहवाल मा.आयुक्त, मनपा यांचे अध्यक्षतेखालील निविदा समिती समक्ष दिनांक ७ मार्च २०२४ ला सादर करण्यात आला. त्यामध्ये M/s LC Infra Projects Pvt. Ltd., Ahmadabad हे Bid capacity criteria पूर्ण करीत नसल्याची बाब समितीच्या निदर्शनास आल्याने त्यांची निविदा वगळता उर्वरीत तांत्रिकदृष्टया पात्र ३ निविदाकारांच्या आर्थिक निविदा उघडण्याबाबत मंजूरी प्रदान करण्यात आली.

प्राप्त मंजूरीन्वये तांत्रिकदृष्टया पात्र ३ निविदाकारांच्या आर्थिक निविदा दिनांक ११.०३.२०२४ ला उघडण्यात आल्यात. यामध्ये निम्नतम निविदाकार मे. P.DAS INFRASTRUCTURE PVT LTD (L१) यांची प्राकलनीय राशी रु. ११५,५०,०२,८९६/- पेक्षा १३.७५ टक्के कमीची म्हणजेच रु. ९९,६१,८९,९९७.८० ची निम्नतम निविदा प्राप्त झालेली आहे. यावर GST १८ टक्के प्रमा रु. १७,९३,१४,१९९.६० एवढी देय राहील. एकूण खर्चाची राशी रु. ११७,५५,०४,१९७.४० एवढी आहे.

करीता, निम्नतम निविदाकार मे. P. DAS INFRASTRUCTURE PVT LTD (L१) यांचे निम्नतम निविदेस व खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप: १. विस्तृत माहिती नस्तीमध्ये उपलब्ध आहे.
२.सदर्हू खर्च अमृत-२.० अनुदानाअंतर्गत आणि मनपाचा हिस्सा १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त निधीतून व्यय पद क्र. A४३८०१९४०७०४ अंतर्गत करण्यांत येईल.

# <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 822/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 12/03/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अधिक्षक अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार अमृत २.० योजनेअंतर्गत "पोहरा नदी प्रदूषण निर्मुलन प्रकल्प" मलनि:स्सारण

योजनेची कामे. Package-४ Construction of Sewage collection System of SZ-४, GM ४-२, GM ४-४ and allied works.

नागपूर महानगरपालिके करीता केंद्र पुरस्कृत शासनाचे अमृत-२.० योजने अंतर्गत "पोहरा नदी प्रदूषण निर्मुलन प्रकल्प" अंतर्गत नागपूर शहरातील साऊथ सिवरेज झोन व हुडकेश्वर आणि नरसाळा करीता सांडपाणी संकलन प्रणालीचा विकास करणे व प्रक्रिया बाबतचा रु. १०३०/- कोटींचा विस्तृत प्रकल्पाचा समावेश करण्यात आलेला आहे. केंद्र पुरस्कृत अमृत-२.० अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत शासन निर्णय क्र. अमृत-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-३३, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १४ जुलै २०२२ अन्वये निर्णयात नमुद केल्यानुसार केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान २५%, राज्यशासन अनुज्ञेय अनुदान २५% महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे आणि नागपूर महानगरपालिकेचा हिस्सा ५०% आहे.

नागपूर महानगरपालिकेद्वारे पोहरा नदी प्रदूषण निर्मुलन प्रकल्प चा विस्तृत प्रकल्प अहवाल रु. ९५७.०१ कोटी (GST सह) तयार करण्यात येवून मुख्य अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी तांत्रिक मंजूरी दिनांक २८.०७.२०२३ ला प्रदान केलेली आहे. तसेच शासन निर्णय क्र. अमृत-२०२३/प्र.क्र.४६०/नवि-३३, मंत्रालय मुंबई – ४०००३२, दिनांक ९ नोव्हेंबर २०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. प्राप्त मंजूरीन्वये पोहरा नदी प्रदूषण निर्मुलन प्रकल्पाकरीता एकूण ५ पॅकेजमध्ये निविदा दिनांक ११.०१.२०२४ ला प्रसिध्द करण्यात येवून त्याची अंतिम मुदत दिनांक २७.०२.२०२४ ही होती.

विषयांकीत पॅकेज क्र. ४ करीता ई-निविदा दिनांक ११.०१.२०२४ ला बोलविण्यात आल्या असता दिलेल्या मुदतीत दिनांक २७.०२.२०२४ पर्यंत एकूण ४ निविदा प्राप्त झाल्यात. प्राप्त चारही निविदाकारांचे तांत्रिक निविदा तपासणी अहवाल मा.आयुक्त, मनपा यांचे अध्यक्षतेखालील निविदा समिती समक्ष दिनांक ७ मार्च २०२४ ला सादर करण्यात आला. त्यामध्ये M/s LC Infra Projects Pvt. Ltd., Ahmadabad हे Bid capacity criteria पूर्ण करीत नसल्याची बाब समितीच्या निदर्शनास आल्याने त्यांची निविदा वगळता उर्वरीत तांत्रिकदृष्टया पात्र ३ निविदाकारांच्या आर्थिक निविदा उघडण्याबाबत मंजूरी प्रदान करण्यात आली.

प्राप्त मंजूरीन्वये तांत्रिकदृष्टया पात्र ३ निविदाकारांच्या आर्थिक निविदा दिनांक ११.०३.२०२४ ला उघडण्यात आल्यात. यामध्ये निम्नतम निविदाकार मे. P.DAS INFRASTRUCTURE PVT LTD (L१) यांची प्राकलनीय राशी रु. ११५,५०,०२,८९६/- पेक्षा १३.७५ टक्के कमीची म्हणजेच रु. ९९,६१,८९,९९७.८० ची निम्नतम निविदा प्राप्त झालेली आहे. यावर GST १८ टक्के प्रमा रु. १७,९३,१४,१९९.६० एवढी देय राहील. एकूण खर्चाची राशी रु. ११७,५५,०४,१९७.४० एवढी आहे.

करीता, निम्नतम निविदाकार मे. P. DAS INFRASTRUCTURE PVT LTD (L१) यांचे निम्नतम निविदेस व खर्चास मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.